# स्त्रीउद्धारक रमाबाई महादेव रानडे

**सुरज विजय चौगुले**
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर

**प्रस्तावना:**

१९ व्या शतकाच्या सुरुवातीस भारतीय समाजात जातीसंस्था, अस्पृशता या अनिष्ट प्रथा,परंपरा यांचे जेवढे प्राबल्य होते, तेवढेच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त जाचक सामाजिक व कौटुंबिक बंधनांचे पालन स्त्रियांना करावे लागत होते. बालविवाह, जरठ कुमारी विवाह, पडदापद्धती, सतीप्रथा, केशवपन इ. प्रथाद्वारे व विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण आणि विधवांच्या शिक्षणास विरोध इ.मुळे स्त्रियांचे शोषण होत होते. महाराष्ट्रात या अनिष्ट व अन्यायकारी परंपरावर नाना शंकर शेठ,बाळशास्त्री जांभेकर, विष्णुशास्त्री पंडित, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, रा. गो. भांडारकर, न्यायमूर्ती रानडे व गोपाळ गणेश आगरकर इ. समाज सुधारकांनी पाश्चात्य शिक्षण व ज्ञानाने प्रेरित होऊन टीका करण्यास सुरुवात केली. त्यानंतर या व्यवस्थेत काही प्रमाणात बदल होत गेले. त्यातून नवविचार व आचारासाठी जनजागृती केली जाऊ लागली.या कामी महिला समाजसुधारकांचीही भूमिका महत्त्वाची राहिली आहे. अशा महिला समाजसुधारकांमध्ये रमाबाई रानडे यांचे महिलांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी केलेले कार्य उल्लेखनीय आहे प्रस्तुत शोधनिबंधामध्ये रमाबाई रानडे यांनी स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी केलेल्या सामाजिक कार्याची मांडणी करण्यात आली आहे.

महिलांना आपल्या ठायीच्या कर्तृत्वाची, क्षमतांची, आपल्या हक्क-अधिकारांची,जाणीव व्हावी आणि त्यांना स्वावलंबी, प्रतिष्ठित जीवन जगता यावे यासाठी शर्तीचे प्रयत्न करणारे प्रगतिशील विचारसरणीचे व्यक्तिमत्व म्हणून रमाबाई रानडे स्मरणात राहतात. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या पत्नी असलेल्या रमाबाईंनी शोषिकपणा, ज्ञानसंपदनाची तीव्र तळमळ आणि आपल्या पतीचे मार्गदर्शन व अभ्यास या सामग्रीच्या साह्याने अनेक विषयांमध्ये प्रावीण्य संपादन केले. न्यायमूर्ती रानडे यांनी जपलेले स्त्रीशिक्षण व सुधारणेचे व्रत रमाबाईंनी हा तहहयात चालविले. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या स्त्रियांसाठी त्यांनी विविध प्रकारचे वर्ग त्यांनी सुरू केले. स्त्री- सुधारणांच्या त्यांच्या खटाटोपाचे समूर्त आणि संस्थात्मक रूप म्हणजे पुणे येथे त्यांनी स्थापन केलेली 'सेवासदन' ही संस्था. स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी पुस्तकी शिक्षणाच्या व ज्ञानाच्या जोडीनेच व्यवसाय शिक्षण, स्त्रियांनी तयार केलेल्या भरतकाम - शिवणकामाच्या तसेच हस्तकला कौशल्याच्या वस्तूंचे प्रदर्शन, स्त्री गुन्हेगारांचे पुनर्वसन आणि स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा यासाठी सरकारदरबारी प्रयत्न असे, रमाबाईंचे बहुआयामी कार्य स्मरणीय आहे. म्हणूनच भारताच्या व विशेषत: महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात त्यांनी केलेले स्त्री उद्धाराचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकने गरजेचे आहे.

**रमाबाई रानडे (१८६२ ते १९२४)**

पंडिता रमाबाईनंतर स्त्रियांसाठी उल्लेखनीय कार्य करणारी स्त्री म्हणजे रमाबाई रानडे होय. सातारा जिल्ह्यातील 'देवराष्ट्रे' या गावी कुर्लेकर सरदार घराण्यात २५ जानेवारी १८६२ मध्ये रमाबाईंचा जन्म झाला. त्यांचे माहेरचे नाव यमुना कुर्लेकर.[१] त्यांचे वडील व आजोबा अत्यंत धर्मशील व करारी होते. त्यांची आई मिरजेचे राजवैद्य करमकर यांची मुलगी होती. समंजसपणा,सोशिकता, शहाणपणा, मायाळूपणा इत्यादी गुण रमाबाईंनी आपल्या आईकडूनच घेतले होते. वयाच्या ११ व्या वर्षी १८७३ मध्ये रामाबाईंचा चा विवाह न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्याशी झाला. विवाहाच्या वेळी ते विधुर होते. न्यायमूर्ती रानडे यांचे वय ३२ वर्षे होते. म्हणजे त्या दोघांच्या वयात २१ वर्षाचे अंतर होते. अर्थात स्वतः रानडे हे सुधारक होते. रमाबाईकडे रंग, रूप, विद्या यापैकी काहीच नव्हते. ते विधवा विवाहाचे पुरस्कर्ते होते म्हणून रानडे यांनी एखाद्या विधवेशी विवाह करणे अपेक्षित होते, पण त्यांच्यापेक्षा २१ वर्षांनी लहान असणाऱ्या रमाबाईशी त्यांनी विवाह केला होता. त्याबद्दल त्यांच्यावर टीका केली गेली.[२] पण वडिलांच्या दडपणाखाली त्यांना हा विवाह मान्य करावा लागला. विवाहाच्या दिवशी ते आनंदी नव्हते. त्यांनी रजाही घेतली नव्हती. एका प्रतिष्ठित, खानदानी, सुसंस्कृत, बहुश्रुत, समाजसुधारक, न्यायाधीश असलेल्या व्यक्तीची पत्नी होण्याचे भाग्य रमाबाईंना लाभले होते.

**विवाहनंतर शिक्षण व व्यक्तिमत्त्वाची जडणघडण**

१९ व्या शतकातील परिस्थिती लक्षात घेता रमाबाई यांच्या आईला रोग्यांचे औषधपाणी व सेवा करण्याचे स्वातंत्र्य होते. असे असले तरी हेच कुर्लेकर घराणे सनातनी प्रकारात मोडणारे होते. घरातील स्त्रिया, मोठ्या मुलींना ओटीवर येण्यास मनाई होती. रमाबाई यांच्या एका आत्याला लिहिणे- वाचणे शिकवले होते. त्या व्यंकटेशस्त्रोत वाचत. पण पुढे त्यांना वैधव्य आल्याने शिक्षणाचा संबंध हा अशुभ गोष्टीशी जोडण्यात आला. परिणामी, रमाबाई यांच्या घरामध्ये स्त्रियांकरता लिहिणे-वाचणे जणू निशिद्धच झाले. त्यामुळे त्यांच्या घरामधील सर्व स्त्रियांना लिहिण्यावाचण्याचा गंधही नव्हता. त्यामुळे लग्नाच्या वेळेपर्यंत रमाबाईंना अक्षर ओळखी नव्हती.[३] रमाबाईंना न्यायमूर्ती रानडे यांनी मुळाक्षरे, बाराखडी शिकवण्यास सुरुवात केली. रमाबाईंच्या शिक्षणासाठी शिक्षिका नेमली होती. या काळात स्त्रीने शिकल्यामुळे पतीला वैधव्य येते असा समज प्रचलित होता; परंतु पतीच्या प्रोत्साहनामुळे त्या शिकल्या. त्यांना इंग्रजी शिकवण्यासाठी महादेवरावांनी मिस हरफर्ड यांची नेमणूक केली होती; परंतु घरातील कर्मठ व सनातनी वातावरणामुळे शिकवणी संपल्यास थंड पाण्याने स्नान करणे, घरातील कोणत्याही कामास किंवा वस्तू हात न लावणे हा त्रास सहन करावा लागे.[४] फिमेल ट्रेनिंग कॉलेजमधील अनुभवी व शांत स्वभावाच्या सगुनाबाई हिला रानडे यांनी रमाबाईला शिकवण्यासाठी नेमले होते. इ.स.१८८२ मध्ये सार्वजनिक सभांतून बोलण्यास त्यांनी प्रारंभ केला. पुण्यात हिराबागेत सर जेम्स फर्ग्युसन यांच्या उपस्थितीत 2 हजार माणसांपुढे खडखडीत त्या बोलल्या. हायस्कूलच्या मागणीसाठी ती सभा भरली होती(१८९४).[५] यावरून असे म्हणता येईल की, वडिलांच्या व पतीच्या घरातील कर्मठ व सनातनी प्रथा, परंपरांचा त्रास सहन करून रमाबाई यांनी शिक्षण घेतले.

रमाबाई रानडे यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये पंडिता रमाबाईंचा सहवासही महत्त्वाचा ठरतो. पंडिता रमाबाईंनी इ. स.१८८९ मध्ये 'शारदाश्रम' ही संस्था विधवा स्त्रियांसाठी स्थापन केली होती. त्यांच्या सल्लागार समितीत न्यायमूर्ती रानडे व प्रार्थना समाजातील काही मंडळी सहभागी झाली होती. रमाबाई रानडेंचाही 'शारदाश्रम' शी संबंध येत गेला. इ.स.१८९२ मध्ये शारदाश्रमाच्या पुण्यातील इमारतीच्या उद्घाटन सोहळयांच्या

अध्यक्षपदी रमाबाई रानडे होत्या व त्यांनी भाषणात या संस्थेला आर्थिक हातभार लावण्याचे आवाहन केले.[६] वरील मांडणीवरून असे म्हणता येईल की, पती न्या.रानडे व पंडिता रमाबाई यांच्या प्रोत्साहनामुळे रमाबाई रानडे या शैक्षणिक व सामाजिक कार्यात सहभागी होऊ लागल्या.

**सामाजिक कार्य**

रमाबाईंचे कार्य आणि कर्तृत्व यांना खऱ्या अर्थाने गती मिळाली ती महादेवरावांच्या निधनानंतर. समाजसुधारणेचा प्रारंभ रमाबाईंनी स्वतःपासूनच केला आणि तो म्हणजे महादेवराव यांच्या निधनानंतर रमाबाई यांनी केशवपन केले नाही.[७] त्यावेळी समाजात सर्वत्र चालत आलेल्या तसेच त्यांच्या सासरी व माहेरी पाळल्या जाणाऱ्या या अनिष्ट रूढी व परंपरांचा रमाबाईंनी धैर्याने आणि निर्धाराने त्याग केला. स्वतःमहादेवराव विधवाकेशवपन या रुढीच्या विरुद्ध होते. त्यामुळे या अनिष्ट रूढीचे अंतिम निर्मूलन करणे, हा रमाबाई यांच्या तत्वाचा एक भाग बनला. रानडे व कुर्लेकर या दोन्ही घराण्यामध्ये ही रुढी पाळली जात होती. असे असतानाही रमाबाई यांनी सर्वांचा रोष पत्करून, आपल्या पतीने घालून दिलेल्या तत्त्वानुसार वाटचाल करण्यास सुरुवात केली. रमाबाई यांनी पतीच्या निधनानंतर तत्कालीन ज्या अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा होत्या त्या प्रथा परंपरेंचा त्याग केला आणि पती महादेवराव यांच्या आधुनिक विचारसरणीचा पुरस्कार केला.

**१) हिंदू लेडीज सोशल अँड लिटरली क्लब**

इ.स.१८९४ मध्ये मुंबईत त्यांनी 'हिंदू लेडीज सोशल अँड लिटररी क्लब' ची स्थापना केली. यात त्यांना आनंदीबाई भट यांचे सहकार्य लाभले.[८] या संस्थेचा उद्देश स्त्रियांमध्ये ज्ञानप्रसार करून, सामाजिक कर्तृत्वाची जाणीव उत्पन्न करणे हा होता. या संस्थेतर्फे विविध विषयावर उद्बोधक व्याख्यान होत; तसेच स्त्रियांसाठी कीर्तन, प्रवचने होत. या साप्ताहिक व्याख्यानांना सुमारे ७५ स्त्रियांनी सहभाग घेतला. याखेरीज सणासुदीला व विशेष प्रसंगी स्नेहसंमेलने भरवण्यात येत.त्याला शहरातील निरनिराळ्या जाती-धर्माच्या स्त्रिया हजेरी लावत असत. क्लबच्या सभासदांना वर्गणी ऐच्छिक असे. ज्या स्त्रियांना शाळेत जाणे शक्य नसे, त्यांच्याकरता क्लब तर्फे दुपारी दोन ते तीन तास मराठी आणि इंग्रजीचे वर्ग भरत. याशिवाय क्लबमध्ये धार्मिक ग्रंथवाचन, शिवणकाम, फर्स्ट एड याचे वर्ग सुरू करण्यात आले. अर्थातच या वर्गांना चांगला प्रतिसाद मिळू लागला. पुढे मुंबईच्या धर्तीवर पुण्यातही सोशल क्लब स्थापन करून स्त्री जागृतीचे कार्य त्यांनी केले.अशाप्रकारे रमाबाई यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी विविध उपक्रम राबवण्यास सुरुवात केली. त्याच वर्षी हिंदुस्थानातील स्त्रियांना नर्सिंग चे शिक्षण देण्यासाठी मदत व्हावी, म्हणून स्थापन झालेल्या लेडीज डफरीन फंडाच्या, रमाबाई सभासद झाल्या.[९]

**२) तुरुंगातील स्त्री कैद्यासाठी कार्य**

१९०४ च्या जून महिन्यात पुण्याच्या येरवडा तुरुंगाच्या मानद अधिक्षक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. तेव्हापासून दर पंधरा दिवसांनी येरवडा कारागृहातील स्त्री विभागाला रमाबाई भेट देऊ लागल्या. रमाबाई त्यांच्या प्रकृतीची तसेच त्यांच्या तुरुंगातील व्यवस्थेबद्दल विचारपूस करत. पुढे पुढे या स्त्रियांसमोर रमाबाई संत तुकाराम व नामदेवाचे सोपे अभंग म्हणत. नीती आणि सदाचार अशा आशयाच्या या अभंगांचा अर्थ रमाबाई या स्त्रियांना सोप्या शब्दात समजावून देत. तुरुंगातील निराश व अशिक्षित स्त्रियांना यामुळे दिलासा मिळे.एकंदरीत

रमाबाई या कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या स्त्रियांना संत साहित्य, अभंग, प्रवचनांच्या माध्यमातून प्रबोधन करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

**३) अखिल भारतीय महिला परिषद**

इ. स. १९०४ पासून रमाबाई सार्वजनिक सभांना व समारंभांना जाऊ लागल्या. इ. स. १९९४ मध्ये सामाजिक परिषदेच्या काही पुढाऱ्यांनी या परिषदेला पूरक म्हणून अखिल भारतीय महिला परिषद स्थापन केली. ती स्थापन करण्यात रमाबाई रानडे, मिसेस फ्रामाजी, मिसेस तय्यबजी, सौ. काशीबाई कानिटकर वगैरेंचा पुढाकार होता.[१०] इ.स.१९०४ मध्ये या परिषदेचे अध्यक्षपद रमाबाई रानडे यांनी स्वीकारले होते. हा बहुमान त्यांनी सर्वांच्या वतीने वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध नेते डॉ. भांडारकर यांच्या आग्रहांमुळे स्वीकारला होता. या परिषदेसाठी समाजातील सर्व स्तरांतील विविध जातीधर्माच्या व प्रांतातील महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या. या परिषदेत महिलांसाठी वेगळी परिषद का स्थापन करावी लागली यासंबंधी आपले विचार रमाबाईंनी मांडले होते. अध्यक्षपदावरून त्यांनी केलेले भाषण हे अत्यंत अभ्यासपूर्ण होते. पुढे इ.स. १९०७, इ.स. १९१२ व इ.स.१९२० मध्ये सुरत, मुंबई, सोलापूर येथे भरलेल्या अधिवेशनांचे अध्यक्षपदीही रमाबाईंनी भूषवले होते.[११]

**४) सेवासदन स्थापना व कार्य**

इ.स.१९०४ मध्ये 'आद्य भारत महिला परिषदेच्या' व्यासपीठावरून आपल्या अध्यक्षीय भाषणांमध्ये रमाबाईंनी स्त्रियांनी सुशिक्षित होऊन समाजातील परोपकाराची कार्ये हाती घ्यावी, असे प्रतिपादन करताना पाश्चात्त्य देशातील सेवावृत्तीला जीवन वाहून घेतलेल्या 'सिस्टर्स' चा (सेविकांचा) आदर्श भारतीय स्त्रियांपुढे मांडला होता.[१२] रमाबाईंची ही कल्पना बेहरामजी मलबारी व दयाराम गिडुमल या दोन सुधारकांना अतिशय पसंत पडली. ११ जुलै १९०८ रोजी सेवासदन ची स्थापना मुंबईमध्ये झाली. संस्थेसाठी सल्लागार समिती, एंडॉवमेंट, बिल्डिंग फंडाचे ट्रस्टी, ट्रेनिंग कमिटी, इस्लामिया विभाग व हिंदू पारशी आश्रम या कमिट्या स्थापन झाल्या. रमाबाईंनी संस्थेचे व सल्लागार समितीचे अध्यक्षपद स्वीकारले. रमाबाईंचे नियुक्ती तहह्यात अध्यक्षा म्हणून झाली. यांच्याखेरीज सावित्रीबाई भाटवडेकर, लक्ष्मीबाई चंदावरकर, रमाबाई भांडारकर, श्रीमती दोराब टाटा, श्रीमती अली अकबर खान, सोनाबाई जयकर आदी मान्यवर स्त्रिया सभासद या नात्याने नियुक्त झाल्या. दयाराम गिडूमल हे ऑनररी सेक्रेटरी तर लक्ष्मीबाई रानडे व जमनाबाई सकई यांची संयुक्त सेक्रेटरी म्हणून नेमणूक करण्यात आली.[१३] सेवासदन सल्लागार समिती अशी धर्मनिरपेक्ष होती. 'सेवासदन' या संस्थेचे उपनाव 'सिस्टर्स ऑफ इंडिया सोसायटी' असे होते.रमाबाई रानडे या विविध परिषदा, संस्था, संघटनांच्या माध्यमातून स्त्रीउद्धाराचे, समाज परिवर्तनाचे कार्य निष्ठेने करताना दिसतात.

सेवासदन या संस्थेने स्त्रियांना सुशिक्षित व स्वावलंबी बनवणारा कार्यक्रम तयार केला. स्त्रियांसाठी भरतकाम, शिवणकाम, शिक्षण प्रशिक्षण व नर्सिंग आदी अभ्यासक्रम तयार केले होते. सेवासदनच्या विद्यार्थिनींना नर्सिंग शिक्षण मिळावे यासाठी रमाबाईंनी ससून हॉस्पिटलचे सिव्हील सर्जन कर्नल स्मिथ यांना विनंती केली. सेवासनदच्या वार्षिक बक्षीस समारंभाच्या प्रसंगी पुण्यातील जे मान्यवर उपस्थित होते, त्यापैकी एक कर्नल स्मिथ होते. त्यामुळे त्यांना सेवासदनचे उद्देश व कार्य याबद्दल नुसतीच जाणीव नव्हती, तर आत्मीयताही होती. त्यांनी विद्यार्थिनी करता नर्सिंगचा कोर्स तयार करून त्याला जनरल सर्जनची मंजुरी मिळवली.[१४] सेवासदन ही प्रामुख्याने स्त्री संस्था होती. 'सेवासदन'चा सतत विस्तार होत गेला. इ.स. १९३५ मध्ये सेवासदनच्या सर्व शाळा मिळून एक

हजार विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या. सेवासदन मध्ये शिक्षण घेतलेल्या स्त्रिया नर्सेस,मिड वाइफ, सब असिस्टंट सर्जन, शिक्षिका म्हणून मोठ्या संख्येने काम करीत होत्या. इ. स. १९१२ मध्ये गुजरातमध्ये दुष्काळ पडला तेव्हा 'सेवासदन' चे पथक तेथे मदतीसाठी गेले होते. त्याच वर्षी नगर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्तांनाही मदत 'सेवासदन' च्या वतीने करण्यासाठी सौ. काशीबाई कानिटकर गेल्या होत्या.[१५] रमाबाई रानडे यांनी सेवासदन संस्थेच्या माध्यमातून स्त्रियांना सुशिक्षित व स्वावलंबी बनवून त्यांना आत्मसन्मान मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

**५)फॅन्सी फेअर**

इ.स. १९१२ मध्ये सेवासदनच्या वर्गणीदार सभासदांची संख्या १३३ असली तरी संस्थेची वार्षिक वर्गणी ९०० च्या वर जात नव्हती आणि खर्च मात्र यापेक्षा जास्त होता. सेवासदनला इमारतीसाठी निधी आणि कायम फंड मिळावा यासाठी १९१२ मध्ये सेवासदनने फॅन्सी फेअर हा नवा उपक्रम हाती घेतला.[१६] या फॅन्सी फेअरसाठी सेवासदनच्या कौन्सिल व इतर सभासदांनी, परिचित स्त्रियांनी, विद्यार्थिनींनी कला कौशल्याच्या वस्तू तयार करून प्रदर्शन भरवले. या फेअर विषयी 'ज्ञानप्रकाश' व 'हिंदूप्रकाश' या नियतकालिकामधून अतिशय अनुकूल अभिप्राय आला. मात्र ८ ऑक्टोबर १९१२ च्या 'केसरी' अंकात 'सेवासदनचा एक हितचिंतक' या नावाने एक अत्यंत निंदाजनक पत्र आले. या पत्रामध्ये लेखकाने सेवासदनचा उल्लेख 'मिनी बाझार' असा केला होता.[१७]

**६)मुलींसाठी सक्तीचे प्राथमिक शिक्षण**

सेवासदनच्या कामात व्यग्र असतानाच रमाबाई यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात दोन महत्त्वाची आंदोलने करण्यात आली. त्यापैकी एक म्हणजे मुलींसाठी सक्तीचे प्राथमिक शिक्षण. इ.स. १९१८ मध्ये मुंबई कायदे कौन्सिलने प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत जो कायदा (पटेल ॲक्ट) संमत केला, त्यानुसार मुंबई इलाख्यातील म्यूनिसिपालिट्यांना आपल्या भागातील पाच ते अठरा वर्षाच्या मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्याला अनुसरून सातारा, सुरत, वांद्रे येथील म्युनिसिपालीट्यानी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.[१८] या शहराप्रमाणे पुण्यातही पटेल ॲक्ट राबवण्याचा विचार सुरू झाला. परंतु असे शिक्षण अंमलात आणण्याकरता आवश्यक असलेली अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली नव्हती. त्यासाठी नवे कर आखण्याची योजना आखण्यात आली होती. तेव्हा रमाबाई रानडे यांचे नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ नगरपालिकेच्या अध्यक्षाला भेटले व मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे अशी मागणी केली. १२ फेब्रुवारी १९२० रोजी त्यांच्या नेतृत्वाखाली स्त्रियांची प्रचंड मिरवणूक सेवासदनपासून निघाली होती. त्यात २००० स्त्रियांचा सहभाग होता. यातून त्यांचे संघटन कौशल्य सिद्ध होते. मुलींना मोफत व सक्तीच्या शिक्षणासंबंधीच्या या लढ्यासाठी रमाबाईंनी अथक परिश्रम केले. या लढ्यासंबंधीची माहिती हिंदुस्थानातील निरनिराळ्या शहरातील स्त्रियांना व संस्थांना व्हावी यासाठी त्या प्रयत्नशील राहिल्या. त्यांना हिंदुस्थानातील विविध भागातून पाठिंब्याची पत्रे आली. थोडक्यात,रमाबाईंना या चळवळीचे यश मर्यादित स्वरूपात जरी मिळाले तरी त्यांनी एका स्थानिक प्रश्नाचे देशवासी प्रश्नात रूपांतर केले असे म्हणता येईल.

**७)स्त्रियांच्या मताधिकारासाठी आंदोलन**

स्त्रियांना मताधिकार मिळावा म्हणून इ.स.१९१२ पासून मुंबई, मद्रास व बंगाल प्रांतात आंदोलन सुरू झाली. मुंबई प्रांतातील स्त्री अधिकाराच्या चळवळीसाठी रमाबाई रानडे यांच्या अधिकाराखाली २० प्रमुख स्त्रियांची एक समिती नेमण्यात आली.[१९] तिच्यामार्फत दोन स्त्रियांना यासंदर्भात काम करणाऱ्या कमिटी पुढे साक्ष

देण्यासाठी इंग्लंडला पाठवले. या सर्व प्रयत्नांचा परिणाम इंग्लंडमधील जॉईंट कमिटीने स्त्रियांच्या मताधिकाराचा प्रश्न सोडविण्याचे काम भारतातील विभिन्न धर्मीय पुरुष व प्रांतिक सरकारवर सोपविले. २७ जुलै १९२१ रोजी हिरालाल देसाई यांनी मुंबई कायदेमंडळात यासंबंधीचा ठराव चर्चेला ठेवला. तेव्हा प्रेक्षक गॅलरीत विविध धर्माच्या स्त्रियासह रमाबाई रानडेही हजर होत्या. मुंबई कायदेमंडळात तीन दिवस चर्चा होऊन स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्याचा ठराव ५२ विरुद्ध २५ अशा बहुमताने पास झाला.[१०] अशाप्रकारे रमाबाई रानडे यांनी स्त्रियांना शैक्षणिक हक्काबरोबर राजकीय काही मिळवून देणारा प्रयत्न केला.

आपल्या मुलीच्या आग्रहामुळे रमाबाईंनी १९२० मध्ये 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे आत्मचरित्र लिहिले. महादेवरावांच्या मृत्यूनंतर रमाबाईंनी महादेवरावांनी निरनिराळ्या वर्षी प्रार्थना समाजात जे धर्मासंबंधी उपदेश केले होते आणि जी व्याख्याने दिली होती, ती त्यांनी एकत्र केली. त्यापैकी काहींचे वृत्तपत्रीय अहवाल, काही श्रोत्यांनी लिहून घेतले सारांश उपलब्ध झाले. द्वारकानाथ गोविंद वैद्य यांच्या सहाय्याने रमाबाईंनी सर्व साहित्य जमवले; स्वतः वाचले; तपासले आणि १९०२ मध्ये 'न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांची धर्मपर व्याख्याने' या नावाने हा संग्रह त्यांनी महादेवरावांच्या प्रथम वर्षश्राद्धाच्या तिथीस ग्रंथरूपाने प्रसिद्ध केला. ही रमाबाईंनी माधवरावांना वाहिलेली श्रद्धांजली होती. इ.स.१९१५ मध्ये त्यांनी 'न्यायमूर्ती रानडे यांची व्याख्याने आणि लिखाण'(Miscellaneous writings and speeches of Ranade) ग्रंथरूपाने प्रसिद्ध केला. २६ एप्रिल १९२४ रोजी हृदयविकार, पोटदुखी, वगैरे आजाराने त्यांचे निधन झाले.

पतीच्या मृत्यूनंतर रमाबाईंनी समाज सुधारणा, स्त्री शिक्षण, स्त्रीजीवन विकास या कार्यास सतत २३ वर्षे वाहून घेतले. समाजापुढे पतिव्रता धर्माचा आणि स्त्री कर्तृत्वाचा नवीन आदर्श त्यांनी निर्माण करून दाखविला. सामाजिक, शैक्षणिक कार्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी रमाबाई रानडे या मार्गदर्शक दीपस्तंभा सारख्या ठरल्या, असे म्हणणे अधिक संयुक्त ठरेल.

**संदर्भ साधने व तळटिपा**

१. मा.ग.रा.कामत,सेवाव्रती रमाबाई महादेव रानडे, महाराष्ट्र चरित्र-ग्रंथमाला, गंधर्ववेद प्रकाशन,२०१०,पृ.२०.

२. एस.एस.गाठाळ,महाराष्ट्रातील समाजसुधारक: रमाबाई रानडे कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ.१७३.

३. मा.ग.रा.कामत,उपरोक्त, पृ.२१.

४. एस.एस.गाठाळ,उपरोक्त, पृ.१७४.

५. कित्ता,पृ.१७४.

६. कित्ता,पृ.१७४.

७. म.श्रीनिवास,विद्वांस: रमाबाई रानडे, व्यक्ती व कार्य, मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई,१९८९.

८. मा.ग.रा.कामत,उपरोक्त, पृ.८३.

९. कित्ता,पृ.८३.

१०. एस.एस.गाठाळ,उपरोक्त, पृ.१७५.

११. कित्ता,पृ.१७५.

१२. म.श्रीनिवास,उपरोक्त पृ.६८.

१३. मा.ग.रा.कामत,उपरोक्त, पृ.९३.

१४. कित्ता,पृ.९७.

१५. एस.एस.गाठाळ, उपरोक्त,१७६.

१६. मा.ग.रा.कामत, उपरोक्त, पृ.९९.

१७. कित्ता,पृ.१०१.

१८. 'रमास्मृती' अमृतमहोत्सव, पुणे सेवासदन सोसायटी, पुणे,२ ऑक्टोंबर १९८५.

१९. एस.एस.गाठाळ,उपरोक्त, पृ.१७६.

२०. कित्ता, पृ.१७७.